अग्निशमन वाहनाचा गैरवापर टाळणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्र.अशस १४०८/४२९/नवि-२४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १७ एप्रिल, २००८**

**शासन परिपत्रक :**

'अग्निशमन सेवा' ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे केंद्र शासनाने या सेवेचे **"अग्निशमन व आणीबाणी सेवा"** असे नामकरण केले आहे. सध्या काही निवडक महानगरपालिका वगळता अन्य महानगरपालिका / नगरपरिषदेकडील अग्निशमन सेवेचा दर्जा समाधानकारक नाही, तर जवळपास १०० नगरपरिषदांकडे अग्निशमन सेवा नाही.

०२. "अग्निशमन सेवा" ही अत्यावश्यक सेवा असली तरी या वाहनाचा रस्ते धुणे, गावातील साफसफाई करणे, पाणी पुरवठा करणे, इ. सारख्या अग्निशमन सेवेशी संबंधित नसलेल्या कामासाठी त्याचा वापर करण्याकरीता अग्निशमन दलाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना निदेश दिले जात असल्याबद्दलचे संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्या निदर्शनास आले आहे. सध्या सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांचेकडे आवश्यक तेवढया प्रमाणात अग्निशमन केंद्र आणि अग्निशमन वाहन उपलब्ध नाहीत, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अग्निशमना व्यतिरिक्त वर नमूद केलेल्या इतर प्रयोजनासाठी अग्निशमन वाहनाचा वापर केला गेल्यास एखाद्या ठिकाणी दुर्घटना घडल्यास तेथे अग्निशमन वाहन उपलब्ध होण्यास व विमोचन कार्यात अडथळा निर्माण होवून मोठया प्रमाणात जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच याबाबतीत अकारण महापालिका/नगरपालिका प्रशासनास टिकेस तोंड दयावे लागेल. सबब, असे प्रसंग निर्माण होवू देवू नयेत याची दक्षता महापालिकेचे आयुक्त आणि मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे.

०३. तरी या शासन परिपत्रकान्वये सर्व महानगरपालिकांना सूचना देण्यात येत आहेत की, महापालिका / नगरपालिकांनी अग्निशमन वाहनांचा विमोचन आणि आपत्कालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कामासाठी वापर करु नये आणि त्याचा गैरवापर होवू देवू नये. गैरवापर झाल्यास महापालिकेच्या मालमत्तेचा गैरवापर केल्याबद्दल संबंधितांविरुध्द नियमानुसार कारवाई केली जाईल असे महापालिका / नगरपालिकांतील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( टी. सी. बेंजामिन )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन
कृ.मा.प....

ROTA | H 783 (500-4-08)

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
२) मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे विशेष कार्य अधिकारी,
३) आयुक्त, सर्व महानगरपालिका,
४) आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय,
५) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक नगरपालिका संचालक,
६) अग्निशमन सल्लागार व संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,मुंबई-९८.
७) मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका,
८) नगर विकास विभागातील सर्व अधिकारी,
९) निवडनस्ती, नगर विकास विभाग (नवि-२४)

H 783-125